# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. स्थायी समिती सभा दि. १७/०३/२०२६

मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. स्थायी समिती सभा मंगळवार दि. १७/०३/२०२६ रोजी सभा सुचना क्र. ०३ दि. ११/०३/२०२६ रोजीच्या विषयपत्रिकेवरील विषयांवर विचार विनिमय करण्यासाठी मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, दुसरा मजला, लाल बहाद्दुर शास्त्री सभागृहात सकाळी ११.०० वा. सभा आयोजित करण्यांत आली होती.

सदर सभेच्या अध्यक्षस्थानी मा. सभापती, श्री. हसमुख मोहनलाल गेहलोत हे उपस्थित होते. सदर सभेस खालील सदस्य उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १ | श्री. हसमुख मोहनलाल गेहलोत | मा. सभापती |
| २ | श्री. पंकज सुर्यमणी पांडेय | सदस्य |
| ३ | श्री. दिपक कल्याणराव सावंत | सदस्य |
| ४ | श्री. विशाल जगन्नाथ पाटील | सदस्य |
| ५ | श्री. संजय अनंत थेराडे | सदस्य |
| ६ | श्री. आनंद दत्ताराम मांजरेकर | सदस्य |
| ७ | श्रीम. वंदना संजय भावसार | सदस्या |
| ८ | श्रीम. हेतल रतीलाल परमार | सदस्या |
| ९ | श्री. मनोज रामनारायण दुबे | सदस्य |
| १० | श्री. गणेश गोपाळ शेट्टी | सदस्य |
| ११ | श्री. अनिल रवजीभाई विराणी | सदस्य |
| १२ | श्री. नविन गुप्तेश्वर सिंग | सदस्य |
| १३ | श्री. श्रीप्रकाश जिलेदार सिंग | सदस्य |
| १४ | श्री. अनिल दिवाकर सावंत | सदस्य |
| १५ | श्रीम. शर्मिला विन्सन बगाजी | सदस्या |
| १६ | श्री. जय राजेंद्र ठाकूर | सदस्य |

**गैरहजर सदस्य — निरंक**

**मा. सभापती :-**

सचिवांनी सभेच्या कामकाजाला सुरूवात करावी.

**महापालिका सचिव :-**

मिरा भाईंदर महानगपालिकेची मा. स्थायी समिती सभा मंगळवार दि. १७/०३/२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, दुसरा मजला, लाल बहादुर शास्त्री सभागृहात स्थायी समिती सभा सुचना क्र. ०३ मधील प्रकरणांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यांत येत आहे. प्रकरण क्र. ११, मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या सार्वजनिक आरोग्य विभागात, नागरी आरोग्य केंद्रामध्ये ठोक मानधनावर कार्यरत असलेल्या वैद्यकीय अधिकारी/कर्मचारी, विविध विभागामध्ये कार्यरत ऑडिट लिपीक व पशुसंवर्धन विभागामध्ये कार्यरत अधिकारी/कर्मचारी यांच्या नियुक्तीचे नविकरण करणेबाबत. (फेरसादर)

**अनिल सावंत :-**

मा. सभापतीच्या परवानगीने मागील सभेमध्ये उद्यानच्या निगडीत विषय होता त्यावेळी चर्चा करण्यात आली नाही. मिरारोड मधील शांतीनगर, शांतीपार्क, शितल नगर आणि साईबाबा नगरमध्ये जे ओपन आर.जी होते. ते मागच्या ७-८ वर्षापासून आर.जी. मोकळे सोडले आहेत. लोकांसाठी जे गार्डन आहे त्याचे मेन्टेनन्स होत नाही. शांतीनगरमध्ये ८-९ गार्डन आहेत शितल नगरमध्ये १ गार्डन आहे, साईबाबा नगरमध्ये एक गार्डन आहे. आजूबाजूच्या सोसायटी देखभाल करतात परंतू कधी त्यांना कामगार मिळत नाही तसेच मेन्टेनन्सचा विषय असतो. रहिवासी वृक्षकर वैगेरे देतात त्यामूळे

ती गार्डन पालिकेनी घेवून मेन्टेन करावी अशी अपेक्षा आहे. तिथे काही इनवेस्टमेंट करा किंवा काही बांधा असे आम्ही म्हणत नाही. तिकडे साफसफाई झाडाची छाटणी करावी अशी आमची अपेक्षा आहे.

**अतिरिक्त आयुक्त :-**

मा. सभापतीच्या परवानगीने अनिल सावंत साहेबांनी जो मुद्दा उपस्थित केला आहे तो बरोबर आहे पूर्वी मनपा मेन्टेनन्स करत होती परंतु शासनाकडून एक परिपत्रक आले की आर.जी. सोसायटीची असल्यामूळे मनपा मेन्टेंन करू शकत नाही त्यामूळे आपण ते करत नाही. आर.जी. प्लॉट आपण मेन्टेंन केले तर भविष्यात खर्च वाढेल नव्याने जे आर.जी. होतील ते करणे कितपत योग्य आहे. शासनाने परिपत्रक काढल्यामूळे आपण बंद केले आहे. ह्याबाबत आपल्याला धोरणात्मक निर्णय घ्यावा लागेल.

**अनिल सावंत :-**

मुंबई मनपा आणि ठाणे मनपामध्ये तुम्ही बघीतले असेल सोसायटीच्या आतमध्ये जे पेव्हरब्लॉक बसवतात ते आमदार आणि नगरसेवक आपल्या निधीतून लावून देतात. प्रायव्हेट आर.जी. सांगत नाही ते सोसायटी मेन्टेंन करेल.

**संभाजी पानपट्टे, अतिरिक्त आयुक्त :-**

अगोदर गार्डन मेन्टेन होती आता सोसायटी मेन्टेन करत नाही हे आम्हाला माहित आहे.

**अनिल सावंत :-**

सोसायटी आर.जी. मेन्टेन करू शकत नाही.

**संभाजी पानपट्टे, अतिरिक्त आयुक्त :-**

धोरणात्मक निर्णय आहे हा विषय महासभेत घेवून निर्णय घेण्यात यावा.

**अनिल सावंत :-**

सभापती साहेब हा विषय महासभेत घेण्यात यावा.

**मा. सभापती :-**

विषय चांगला आहे. आपण हा विषय महासभेत घेवू.

**दिपक सावंत :-**

प्रशासनाने सादर केलेल्या गोषवाऱ्यातील तक्त्यात नमूद अ.क्र.०१ ते ३४ मधील वैद्यकीय अधिकारी/कर्मचारी, पशुवैद्यकीय अधिकारी व ऑडिट लिपीक यांना एक दिवसाचा तांत्रिक खंड देवून दि.०६/०१/२०२६ ते दि.०५/०७/२०२६ पर्यंत ०६ महिन्यांकरीता विभागाने केलेल्या शिफारशीनुसार मुदतीचे नविकरण करणेस तसेच त्यांच्या ०६ महिन्याच्या वेतनाकरीता अंदाजित रक्कम रु.७३,१४,९४९/- (अक्षरी रु. त्र्याहात्तर लाख चौदा हजार नऊशे एकोणपन्नास मात्र) इतक्या होणाऱ्या खर्चास ही सभा आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देत आहे, असा मी ठराव मांडत आहे.

**हेतल परमार :-**

माझे अनुमोदन आहे.

**अनिल सावंत :-**

मा. सभापती साहेब मागच्यावेळी हा मुद्दा चर्चेला आला तेव्हा एका सदस्यांनी हा उपस्थित केला की इथे फिगर वेगळी असते आणि कर्मचाऱ्यांना वेगळी फिगर दिली जाते. हयाच्यावर प्रशासनाने सांगितले की आम्ही चौकशी करून सांगतो.

**संभाजी पानपट्टे, अतिरिक्त आयुक्त :-**

मा. सभापतीच्या परवानगीने, जे नमुद मानधन आहे आणि मंजूर आहे ते मानधन त्या कर्मचाऱ्याच्या खात्यामध्ये जमा होते

**मा. सभापती :-**

ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात येत आहे.

**प्रकरण क्र. ११ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या सार्वजनिक आरोग्य विभागात, नागरी आरोग्य केंद्रामध्ये ठोक मानधनावर कार्यरत असलेल्या वैद्यकीय अधिकारी/कर्मचारी, विविध विभागामध्ये कार्यरत ऑडिट लिपीक व पशुसंवर्धन विभागामध्ये कार्यरत अधिकारी/कर्मचारी यांच्या नियुक्तीचे नविकरण करणेबाबत. (फेरसादर)

**ठराव क्र. ०८ :-**

प्रशासनाने सादर केलेल्या गोषवाऱ्यातील तक्त्यात नमूद अ.क्र.०१ ते ३४ मधील वैद्यकीय अधिकारी/कर्मचारी, पशुवैद्यकीय अधिकारी व ऑडिट लिपीक यांना एक दिवसाचा तांत्रिक खंड देवून दि.०६/०१/२०२६ ते दि.०५/०७/२०२६

पर्यंत ०६ महिन्यांकरीता विभागाने केलेल्या शिफारशीनुसार मुदतीचे नविकरण करणेस तसेच त्यांच्या ०६ महिन्याच्या वेतनाकरीता अंदाजित रक्कम रु.७३,१४,९४९/- (अक्षरी रु. त्र्याहात्तर लाख चौदा हजार नऊशे एकोणपन्नास मात्र) इतक्या होणाऱ्या खर्चास ही सभा आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देत आहे, असा मी ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. दिपक सावंत** **अनुमोदन :- श्रीम. हेतल परमार**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**महापालिका सचिव :-**

प्रकरण क्र. १२, विधी विभागामध्ये तात्पुरत्या स्वरुपात ठोक मानधनावर कार्यरत श्रीम. सावनी पाटील, सहा. विधी अधिकारी यांचे नियुक्तीचे नविकरण करणेबाबत. (फेरसादर)

**आनंद मांजरेकर :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका प्रशासनाने सादर केलेल्या गोषवा-यानुसार श्रीम. सावनी पाटील, सहा.विधी अधिकारी यांना दि.२६/०२/२०२६ रोजी ०१ दिवसाचा तांत्रिक खंड देऊन दि.२७/०२/२०२६ ते दि.२५/०८/२०२६ पर्यंत पुढील ०६ महिन्यांसाठी नियुक्तीचे नविकरण करणेकरीता तसेच त्यांच्या वेतनाकरीता येणाऱ्या रू.२,४०,०००/- इतक्या खर्चास ही सभा मंजुरी देत आहे, असा मी ठराव मांडत आहे.

**वंदना भावसार :-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात येत आहे.

**प्रकरण क्र. १२ :-**

विधी विभागामध्ये तात्पुरत्या स्वरुपात ठोक मानधनावर कार्यरत श्रीम. सावनी पाटील, सहा. विधी अधिकारी यांचे नियुक्तीचे नविकरण करणेबाबत. (फेरसादर)

**ठराव क्र. ०९ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका प्रशासनाने सादर केलेल्या गोषवा-यानुसार श्रीम. सावनी पाटील, सहा.विधी अधिकारी यांना दि.२६/०२/२०२६ रोजी ०१ दिवसाचा तांत्रिक खंड देऊन दि.२७/०२/२०२६ ते दि.२५/०८/२०२६ पर्यंत पुढील ०६ महिन्यांसाठी नियुक्तीचे नविकरण करणेकरीता तसेच त्यांच्या वेतनाकरीता येणाऱ्या रू.२,४०,०००/- इतक्या खर्चास ही सभा मंजुरी देत आहे, असा मी ठराव मांडत आहे.

सुचक :- श्री. **आनंद मांजरेकर** अनुमोदन :- श्रीम. **वंदना भावसार**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**महापालिका सचिव :-**

प्रकरण क्र. १३, Selection of system integrator for Implementation of Integrate Transit Management System (ITMS) & NCMC Compliant Automatic Fare Collection System (AFCS) for Mira Bhayandar Municipal Corporation Transport Undertaking (MBMCTU) या कामी निविदा स्विकारणेस मंजूरी देणेबाबत.

**अनिल विराणी :-**

आपण नविनला मंजूरी देतो जुन्या ठेकेदारांचा कालावधी संपला आहे का?

**परिवहन व्यवस्थापक :-**

जुना ठेकेदाराचा कालावधी संपलेला आहे.

**मा. सभापती :-**

ए.एम.सी. किती आहे?

**परिवहन व्यवस्थापक :-**

जुन्याची ए.एम.सी. सध्या १ कोटी २० लाख वर्षाला आहे. त्यामध्ये त्यांनी २०% वाढीव मागीतले आहे. आपण त्याला वाढीव दिलेले नाही.

**अनिल विराणी :-**

ठेका किती वर्षासाठी होता.

**परिवहन व्यवस्थापक :-**

पहिला प्रोजेक्ट पाच वर्षाचा होता मागच्या २०२५ ला संपला होता. नविन कंम्पलीट होत नाही तोपर्यत त्याला मुदत वाढ दिली आहे. जवळपास वर्षभर त्याला मुदतवाढ दिलेली आहे.

**अनिल विराणी :-**

नविन अपडेट आहात का मुंबईला वेगळी सिस्टीम आहे वसई-विरारला वेगळी सिस्टीम आहे. त्याच्यात आपण नविन काही देणार आहे का?

**परिवहन व्यवस्थापक :-**

मा. सभापतीच्या परवानगीने, ITMS सिस्टममध्ये दिवसेंदिवस बदल होत असतात. २०१८ मध्ये आपण प्रोजेक्ट केला होता. २०२० मध्ये तो कंम्पलीट झाला. आता हयाच्यात बरेचसे बदल झालेले आहेत त्यामुळे नव्याने सॉफ्टवेअर घ्यायला लागत आहे. आपण डी.पी.आर. मधून मॉर्थ मिनिस्ट्री ऑफ हायवे लॅन्डलॉर्ड ट्रान्सपोर्ट दिल्ली सेंट्रल गव्हरमेंटला आपण डी.पी. आर. पाठवला होता. त्या डी.पी.आर. मध्ये ७०% निधी केंद्र सरकारचा आहे आणि ३०% निधी मनपाचा आहे. त्याच्यामध्ये जे फेअर कलेक्शन आहेत त्याच्यात पूर्वीच्या कलेक्शनमध्ये एन.सी.एम.सी. कंम्पलेन्ट नव्हत्या एन.सी.एम.सी. म्हणजे नॅशनल कॉमन मॅाबीलिटी कार्डनुसार ते कार्ड दिले तर त्या कार्डवरून आपण एम.बी.एम.टी, बेस्ट, मेट्रो, आणि रेल्वेचे तिकीट काढू शकतो तो एक त्याच्यात बदल आहे. जुन्या मोबाईल ॲपमध्ये तिकीट काढता येत नाही, पास काढता येत नाही त्यामध्ये आपल्याला बसचे टाईमटेबल समजते. नविन मोबाईल ॲप तयार करणार त्याच्यामध्ये तिकीट काढता येईल तसेच ऑनलाईन पास देखील काढता येईल.

**अनिल सावंत :-**

आय.टी.एम.एस. मध्ये कोणती सेवा देणार आहेत?

**परिवहन व्यवस्थापक :-**

त्याच्यामध्ये हार्डवेअर आणि सॉफ्टवेअर दोन्ही गोष्टी आहेत. आपले ५५ बसस्टॉप जिथे पॅसेजर लोडिंग आणि अनलोडिंग असते अशा ठिकाणी हे सॉफ्टवेअर लावणार आहोत जसे आपल्याला रेल्वेचे समजते ही ट्रेन किती मिनिटात येणार आहे तसेच कोणती बस किती वेळात येणार आहे ते समजण्यासाठी आपण जिथे पॅसेंजर जास्त आहेत तिथे ५५ ठिकाणी पी.आय. एस. बोर्ड लावणार आहेत.

**अनिल विराणी :-**

साहेब कार्ड कोण देणार आहे.

**परिवहन व्यवस्थापक :-**

कार्ड बॅंक देणार आहे. सॉफ्टवेअर आपल्याकडून घ्यावे लागेल.

**अनिल विराणी :-**

ए.एम.सी. किती वर्षासाठी देतो.

**संभाजी पानपट्टे, अतिरिक्त आयुक्त :-**

आता दोन वर्षाचे प्रपोजल दिले आहे.

**अनिल विराणी :-**

ए.एम.सी नाही.

**मा. सभापती :-**

सदस्य महोदय हयाच्यात ए.एम.सी. दिलेले नाही. फक्त दोन वर्षासाठी आहे. आणि मागचे पाच वर्षाचे होते. आणि आता जे आहे ते दोन वर्षाचे आहे.

**अनिल विराणी :-**

दोन वर्षानंतर पून्हा ए.एम.सी. दयायला लागेल.

**परिवहन व्यवस्थापक :-**

हा केंद्र शासनाचा प्रकल्प दोन वर्षासाठी होता त्यामुळे दोन वर्षाची कॅपीटल कॉस्ट आणि ऑपरेशनल कॉस्ट दोन वर्ष असे इनक्लूड करून डी.पी.आर. बनवला त्याच्यात जास्त इनक्लूड केले असते तर तो डी.पी.आर. मंजूर झाला नसता.

**अनिल विराणी :-**

आपण अगोदर पाच वर्षासाठी दिले होते.

**परिवहन व्यवस्थापक :-**

तो वेगळा प्रोजेक्ट होता.

**मा. सभापती :-**

जर आपण पाच वर्षाचे बनवले असते तर शासनाकडून जी मंजूरी आली आहे ती मंजूरी आली नसती. हयाच्यात आपण वाढीव ए.एम.सी. घेवू शकत नाही तर दोन वर्षानी पून्हा खर्च करायचा का?

**अनिल विराणी :-**

सभापती महोदय माझा प्रश्न तो नव्हता. दोन वर्षानंतर हयाच्यामध्ये पुन्हा एवढा खर्च करणार का? जे तुम्ही सॉफ्टवेअर देणार आहे ते दोन वर्षानी पुन्हा देणार का?

**मा. सभापती :-**

हयासाठी ए.एम.सी. नमुद केली पाहिजे. सावंत साहेब आणि अनिल भाईने सांगितले दोन वर्षानी पुन्हा येणार मग मनपाला भुर्दंड नको मनपाचे नुकसान होईल माझा विषय ए. एम.सी. ॲड करता येईल का? आता सध्या ए.एम.सी. किती घेतो.

**परिवहन व्यवस्थापक :-**

वर्षाचे १ कोटी २० लाख घेतो. ठेकेदारांनी २०% वाढीव मागीतले आहेत परंतू आपण दिले नाही.

**मा. सभापती :-**

माझा असा प्रश्न आहे की हा विषय पुन्हा स्थायी समितीमध्ये येणार. आता हे ए.एम.सी मध्ये ॲड करता येईल का? आणि नंबर ऑफ बसेस साठी आहेत का जर बस वाढल्या तर तो घेणार का?

**परिवहन व्यवस्थापक :-**

बसचे काही लिमिट नाही आपण जशा बस ॲड होतील तसे आपण इंटीग्रेशन करणे त्याच्यासाठी बंधनकारक असणार.

**अनिल सावंत :-**

दर वाढवू शकता का?

**परिवहन व्यवस्थापक :-**

दर वाढवू शकतो.

**मा. सभापती :-**

मागच्या वेळी ऑलरेडी पाच वर्षासाठी दिले होते आणि  नंतर ए.एम.सी लावली होती. त्याने ए.एम.सी. वेगळी लावली होती. आता तो १ कोटी २० लाख चार्ज करतो आणि प्लस २०% वाढीव आहे. ते आपल्याला महाग पडते. माझे असे मत आहे की तो १ करोड २० लाख मध्ये ए.एम.सी. करत असेल आणि तेही दोन वर्षानंतर करत असेल तर त्याच्यात मनपाचा फायदा आहे असे करत असेल.

**अनिल विराणी :-**

साहेब करत असेल नाही त्याला बंधनकारक करावे म्हणजे मनपाचा फायदा होईल.

**मा. सभापती :-**

सदस्य महोदय तीन वर्षाचे ॲड करून असा ठराव मांडा.

**दिपक सावंत:-**

निविदा स्विकारणेसाठी प्रशासनाने सादर केलेल्या गोषवाऱ्यानुसार खालीलप्रमाणे शिफारस केली आहे.

| Sl. No. | Bidder Name | Capex | | Opex | | Total Cost incl. Capex & Opex (Incl. GST) | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | Amount (With Out GST) | Amount ((With GST) | Amount (With Out GST) | Amount ((With GST) | Amount (With Out GST) | Amount ((With GST) |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| **1** | **M/s Aeon Software Pvt. Ltd (L1)** | **5,28,48,360/-** | **6,23,61,064.80/-** | **2,87,06,009/-** | **3,38,73,090.62/-** | **8,15,54,369/-** | **9,62,34,155.42/-** |
| 2 | M/s Kerala State Electronics Development Corporation Ltd. (KELTRON) (L2) | 6,49,19,600/- | 7,66,05,128/- | 3,68,04,540/- | 4,34,29,357.20/- | 10,17,24,140/- | 12,00,34,485.20/- |
| **L1 निविदाधारक Aeon Software Pvt. Ltd. यांनी वाटाघाटीअंती मान्य केलेले दर** | | **5,25,84,118/-** | **6,20,49,260/-** | **2,85,62,479/-** | **3,37,03,725/-** | **8,11,46,597/-** | **9,57,52,985/-** |

**अ)** प्रशासनाचे गोषवाऱ्यानुसार **Aeon Software Pvt. Ltd.** यांची वाटाघाटी अंती मान्य केलेल्या दराने निविदा स्विकारणेस व करारनामा करून कार्यादेश देणेस व त्याकामी येणाऱ्या खर्चास **मंजूरीसाठी प्रशासनाने शिफारस केलेली आहे.**

ब) प्रशासनाने सादर केलेल्या गोषवाऱ्यानुसार याकामी CAPEX रू ६,२०,४९,२६०/- व OPEX रु ३,३७,०३,७२५/- अशी आहे. CAPEX ही एक वेळचा खर्च असून OPEX AMOUNT ही २ वर्ष देखभाल दुरूस्तीची आहे. मात्र २ वर्षानंतर सदर कामी पुन्हा CAPEX साठी खर्च होऊन नये व मनपा खर्चाची बचत व्हावी, याकरीता २ वर्षानंतर पुढील ३ वर्षासाठी ठेकेदार यांना AMC देणे उचित होईल. तरी निविदेतील पहिल्या २ वर्षाकरीता दर पाहता प्रति वर्षी सरासरी रु. १,६८,५१,८६३/- इतकी रक्कम येत आहे. तसेच सदर प्रकल्प अंमलबजावणी होऊन Go-Live झाल्यानंतर पहिली २ वर्ष निविदेतील दराने OPEX देय होईल. २ वर्षानंतर पुढील ३ वर्षासाठी सदर दरात कपात करून रु.१.२० कोटी प्रति वर्षप्रमाणे पुढील ३ वर्षासाठी ठेकेदार यांना AMC देणेस व या कामी येणाऱ्या खर्चास ही सभा आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देत आहे. प्रशासनाने ठेकेदारासोबत करारनामा करताना २+३ वर्षे असे एकूण ५ वर्षासाठी करारनामा करण्याची कार्यवाही करावी.

वरीलप्रमाणे मूळ २ वर्षानंतर पुढील ३ वर्षासाठी वरील नमूद दरात AMC चे काम करण्यास ठेकेदार तयार असल्यास Aeon Software Pvt. Ltd. **यांची निविदा स्विकारणेस व २+३ असा ५ वर्षासाठी करारनामा करून कार्यादेश देणेस व त्याकामी येणाऱ्या खर्चास** ही सभा आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देत आहे. असा मी ठराव मांडत आहे.

**अनिल विराणी :-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

ठराव मंजुर.

**प्रकरण क्र. १३ :-**

Selection of system integrator for Implementation of Integrate Transit Management System (ITMS) & NCMC Compliant Automatic Fare Collection System (AFCS) for Mira Bhayandar Municipal Corporation Transport Undertaking (MBMCTU) या कामी निविदा स्विकारणेस मंजूरी देणेबाबत.

**ठराव क्र. १० :-**

निविदा स्विकारणेसाठी प्रशासनाने सादर केलेल्या गोषवाऱ्यानुसार खालीलप्रमाणे शिफारस केली आहे.

| **Sl. No.** | **Bidder Name** | **Capex** | | **Opex** | | **Total Cost incl. Capex & Opex (Incl. GST)** | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | **Amount (With Out GST)** | **Amount ((With GST)** | **Amount (With Out GST)** | **Amount ((With GST)** | **Amount (With Out GST)** | **Amount ((With GST)** |
| **1** | **M/s Aeon Software Pvt. Ltd (L1)** | **5,28,48,360/-** | **6,23,61,064.80/-** | **2,87,06,009/-** | **3,38,73,090.62/-** | **8,15,54,369/-** | **9,62,34,155.42/-** |
| 2 | M/s Kerala State Electronics Development Corporation Ltd. (KELTRON) | 6,49,19,600/- | 7,66,05,128/- | 3,68,04,540/- | 4,34,29,357.20/- | 10,17,24,140/- | 12,00,34,485.20/- |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| (L2) | | | | | | |
| **L1 निविदाधारक Aeon Software Pvt. Ltd. यांनी वाटाघाटीअंती मान्य केलेले दर** | **5,25,84,118/-** | **6,20,49,260/-** | **2,85,62,479/-** | **3,37,03,725/-** | **8,11,46,597/-** | **9,57,52,985/-** |

**अ)** प्रशासनाचे गोषवाऱ्यानुसार **Aeon Software Pvt. Ltd.** यांची वाटाघाटी अंती मान्य केलेल्या दराने निविदा स्विकारणेस व करारनामा करून कार्यादेश देणेस व त्याकामी येणाऱ्या खर्चास **मंजूरीसाठी प्रशासनाने शिफारस केलेली आहे.**

ब) प्रशासनाने सादर केलेल्या गोषवाऱ्यानुसार याकामी CAPEX रू ६,२०,४९,२६०/- व OPEX रु. ३,३७,०३,७२५/- अशी आहे. CAPEX ही एक वेळचा खर्च असून OPEX AMOUNT ही २ वर्ष देखभाल दुरूस्तीची आहे. मात्र २ वर्षानंतर सदर कामी पुन्हा CAPEX साठी खर्च होऊन नये व मनपा खर्चाची बचत व्हावी, याकरीता २ वर्षानंतर पुढील ३ वर्षासाठी ठेकेदार यांना AMC देणे उचित होईल. तरी निविदेतील पहिल्या २ वर्षाकरीता दर पाहता प्रति वर्षी सरासरी रु. १,६८,५१,८६३/- इतकी रक्कम येत आहे. तसेच सदर प्रकल्प अंमलबजावणी होऊन Go-Live झाल्यानंतर पहिली २ वर्ष निविदेतील दराने OPEX देय होईल. २ वर्षानंतर पुढील ३ वर्षासाठी सदर दरात कपात करून रु. १.२० कोटी प्रति वर्षप्रमाणे पुढील ३ वर्षासाठी ठेकेदार यांना AMC देणेस व या कामी येणाऱ्या खर्चास ही सभा आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देत आहे. प्रशासनाने ठेकेदारासोबत करारनामा करताना २+३ वर्षे असे एकूण ५ वर्षासाठी करारनामा करण्याची कार्यवाही करावी.

वरीलप्रमाणे मूळ २ वर्षानंतर पुढील ३ वर्षासाठी वरील नमूद दरात AMC चे काम करण्यास ठेकेदार तयार असल्यास Aeon Software Pvt. Ltd. **यांची निविदा स्विकारणेस व २+३ असा ५ वर्षासाठी करारनामा करून कार्यादेश देणेस व त्याकामी येणाऱ्या खर्चास** ही सभा आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देत आहे. असा मी ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. दिपक सावंत** **अनुमोदन :- श्री. अनिल विराणी**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**महापालिका सचिव :-**

प्रकरण क्र. १४, **मा. आयुक्त यांनी मंजुर केलेल्या निविदांचे अवलोकन करणे. (बांधकाम विभाग)** मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात मौजे महाजनवाडी भारतरत्न गानसाम्राज्ञी स्व. लता मंगेशकर नाट्यगृह येथील उद्वाहक क्र. ०१ ते ०५ देखभाल दुरुस्ती व द्विवार्षिक मुदतीने कॉम्प्रेन्सिव्ह स्वरुपात देखभाल दुरुस्ती करणे.

**मा. सभापती :-**

अवलोकन मंजुर.

**प्रकरण क्र. १४ :-**

**मा. आयुक्त यांनी मंजुर केलेल्या निविदांचे अवलोकन करणे. (बांधकाम विभाग)** - मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात मौजे महाजनवाडी भारतरत्न गानसाम्राज्ञी स्व. लता मंगेशकर नाट्यगृह येथील उद्वाहक क्र. ०१ ते ०५ देखभाल दुरुस्ती व द्विवार्षिक मुदतीने कॉम्प्रेन्सिव्ह स्वरुपात देखभाल दुरुस्ती करणे.

**ठराव क्र. ११ :-**

| | | |
|---|---|---|
| १) | कोटेशन निविदा कालावधी | दि. ०९/१२/२०२५ ते दि. १५/१२/२०२५<br>कोटेशन सुचना क्र. ८८ |
| २) | लेखाशिर्षक | सार्व. इमारती / सिग्नल / जनरेटर / लिफ्ट / कुलर / सौरदिवे/ स्ट्रीट लाईट / विद्युत देखभाल दुरुस्ती (विद्युत दुरुस्ती) |

| | | |
|---|---|---|
| ३) | प्रशासकिय व आर्थिक मंजुरी | दि. १४/१२/२०२५ ते दि. २६/१२/२०२५ |
| ४) | मा. आयुक्त यांची निविदा दरास मान्यता दिनांक | दि. १५/१२/२०२५ |

| अ. क्र. | कामाचे नाव / ठेकेदाराचे नांव | अंदाजित खर्च (जी.एस.टी. वगळून) | निविदा धारकाचे नाव | सादर केलेला दर |
|---|---|---|---|---|
| १. | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात मौजे महाजनवाडी भारतरत्न गानसाम्राज्ञी स्व. लता मंगेशकर नाट्यगृह येथील उद्वाहक क्र. ०१ ते ०५ देखभाल दुरुस्ती व द्विवार्षिक मुदतीने कॉम्प्रेन्सिव्ह स्वरुपात देखभाल दुरुस्ती करणे. | रु. १९,९१,२११/- | **मे. शिंडलर इंडिया प्रा.लि. (मुंबई)**<br>मे. न्यु फिल्ड<br>मे. क्लासिक वर्कस | **२.०० % कमी दराने**<br>अंदाजपत्रकीय दराने<br>१.०० % जास्त दराने |

वरील प्रमाणे निविदेस मा. आयुक्त यांची लघुत्तम निविदाधारक मे. शिंडलर इंडिया प्रा.लि. (मुंबई) यांची २.०० % कमी दराने निविदा जी.एस.टी सह स्विकारण्यास मान्यता दिलेली आहे.

त्यानुसार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३ (ड) नुसार सदर कामाचे अवलोकन करण्यात आले.

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**महापालिका सचिव :-**

प्रकरण क्र. १५, मिरा भाईंदर महानगरपालिकेचे सन २०२५-२६ चे सुधारित व सन २०२६-२७ चे मूळ अंदाजपत्रकास मंजुरी मिळणेबाबत. (अ (सर्वसाधारण) + क (पाणी पुरवठा))

**मा. सभापती :-**

बजेटच्या सभेमध्ये सर्व सदस्यांनी सहभाग घेतला त्यासाठी सर्व सदस्यांचे मनापासून धन्यवाद तसेच मनपा अधिकाऱ्यांचे देखील धन्यवाद. येणारा काळ मिरा भाईंदर शहरवासियांसाठी फायदेशीर राहणार कारण जी वाढ झाली ते सर्व सदस्याना समजले पाहिजे. आयुक्त महोदयांनी जी रक्कम दिलेली आहे ऑन ॲव्हरेज १०२.७३ एवढी आहे. ही रक्कम वाढ झाली आहे कोणत्या विभागामध्ये वाढ झालेली आहे दरामध्ये जी वाढवलेली आहे. नगररचना जे विकास योजनेची काम असतात त्यामध्ये २० कोटीची वाढ केलेली आहे, मालमत्तामध्ये २ कोटीची वाढ केलेली आहे, बांधकाममध्ये ११ कोटीची वाढ केलेली आहे, जाहिरातमध्ये ४ कोटीची वाढ केलेली आहे. पे ॲन्ड पार्कमध्ये पण वाढ केली आहे आणि पार्किगसाठी आपण खर्च करणार आहोत. येणाऱ्या काळामध्ये हे जे बदल आहेत ते शहरासाठी आणि विकासासाठी कसे उपयोगी होईल हयाचे आपण नियोजन करायचे आहे. शिक्षणमध्ये कसे वाढता येईल, आरोग्यामध्ये कसे वाढता येईल, इन्फ्रामध्ये कसे वाढता येईल ह्यावर आपण लक्ष दिलेले आहे. तसेच गटर, रस्ते हे कॉमन काम आहे आपण बायोमॅनिंगवर जास्त लक्ष दिलेल आहे, तसेच शौचालयावर लक्ष दिलेले आहे. तसेच ह्या मनपामध्ये आपल्याला जागा कमी पडते त्यामूळे नविन ऑफिस कसे बांधता येईल ह्यावर आपण लक्ष दिलेले आहे. मिरारोडमध्ये जे शहीद मेजर कौस्तूभ राणे स्मारक आहे त्याचे काम बाकी आहे त्याचा विषय ठेवलेला आहे. ही सर्व सदस्यांची मागणी आहे. शाळा डिजीटल कशी करता येईल तसेच मुलांना युनिफॉर्म कसा देता येईल म्हणजे पालकांचा शाळेकडे बघण्याचा दृष्टीकोन बदलेल. मिरा भाईंदरमध्ये मोठमोठे टॉवर येत आहेत त्यामूळे फायरमध्ये नविन वाहन आणण्याचा आपण विचार करत आहोत. आपल्या समितीने पहिल्यांदा निर्णय घेतला आहे की निसर्गासाठी आपण काही खर्च करत नाही त्यासाठी येणाऱ्या काळामध्ये निसर्गासाठी आपण एक समिती बनवू म्हणजे निसर्गासाठी काय करता येईल त्यासाठी आपण तरतूद ठेवलेली आहे. आपला जो ठराव आहे त्याच्यामध्ये सर्वांनी सहभाग घ्यावा.

**अनिल सावंत :-**

सभापती महोदय कोणती कोणती आपण वाढ केलेली आहे.

**मा. सभापती :-**

नगररचना ३०, कर ५३, भाडे मालमत्ता २, जाहिरात ४, पे ॲन्ड पार्क २, बांधकाम ११.

**अनिल सावंत :-**

खर्च कुठे दाखवला आहे.

**मा. सभापती :-**

खर्च बांधकाम, पाणी, सुर्या प्रकल्प योजना येणार आहे. त्याच्यामध्ये नविन लाईन साठी खर्च होणार आहे. त्यामध्ये आपले इन्कम सोर्स होणार आहे. तर त्यामध्ये नमुद न करता जे पैसे वाढलेले आहेत ते बिलासाठी परत जाणार आहे. सुर्या प्रकल्प योजना येणार आहे त्याचे पाणी वितरण करणार त्याचे जे पैसे येतील आणि बिल सुध्दा येणार आहे.

**अनिल सावंत :-**

नविन ई.एस.आर. साठी आणि बायोमायनिंगसाठी काही प्रोव्हिजन केली आहे का?

**मा. सभापती:-**

बायोमायनिंग आणि बायोगॅससाठी प्रोव्हिजन केलेली आहे. पाण्याच्या टाक्यांसाठी केलेली आहे. शहराच्या हिताचे विषय आपण घेतलेले आहेत. शौचालयाचा जो विषय होता तो देखील घेतलेला आहे. जे नागरिक स्लम मध्ये राहतात त्यांना त्याचा फायदा होईल त्यावर पण आपण लक्ष दिलेले आहे.

**अनिल सावंत :-**

बजेटवर महासभेमध्ये मा. सभापती निवेदन देणार त्यामूळे असे असते की स्थायी समिती सदस्यांनी महासभेमध्ये बोलू नये कारण ही चर्चा झालेली असते परंतू बजेटमध्ये काही धोरणात्मक निर्णय आहेत ते स्थायी समिती घेवू शकत नाही त्याबाबत आपल्याला महासभेमध्ये बोलावे लागते.

**पंकज पांडेय :-**

मा. सभापती के परवानगीसे हमारे वॉर्ड के शौचालय है, वहॉ मै जब व्हिजीट के लिए गया तो उसका मैने व्हिडीयो बनाके पानपट्टे साहब और खांबित साहब को भेजा। हमे वॉर्ड के लोगो को जवाब देना भारी पड जाता है। जो ठेकेदार को ठेका दिया है, वह प्रॉपर साफसफाई नही करते आके खडे रहते है और दुसरे दिन आके करते है। उनका कोई टाईमटेबल नही है।

**मा. सभापती :-**

आयुक्त महोदय ह्या विषयावर लक्ष द्या. सदस्य महोदय आपको दो दिन में उत्तर नही मिलता है, तो आप मुझे आके मिलो।

**वंदना भावसार :-**

मा. सभापती महोदय बजेटच्या मिटींगला अधिकाऱ्यांनी सांगितले की डिटेल्स देतो परंतू अजून काही डिटेल्स दिले नाही. परिवहनचे आले आहेत.

**मा. सभापती :-**

ठीक आहे करून देतो.

**संजय थेराडे :-**

मा. आयुक्त मिरा भाईंदर महानगरपालिका यांनी सादर केलेले सन २०२५-२६ चे सुधारित व सन २०२६-२७ मुळ अंदाजपत्रकामध्ये मा. आयुक्तांचे अंदाजामध्ये सुचविलेली उत्पन्नातील अपेक्षित वाढ/घट आणि सुधारित अदाजपत्रकातील वाढ/घट त्यानुसार विभागण्यात आलेला खर्च विचारात घेवून सन २०२६-२७ चे मुळ अंदाजपत्रक रक्कम रू. **१८९४.०६/-** लाख इतक्या रक्कमेच्या शिल्लकी अंदाजपत्रकास आजची सभा मंजूरी देत आहे अंतिम मान्यतेसाठी मा. महासभेपुढे अर्थसंकल्प सविनय सादर करीत आहोत.

**रु. लाखात**

| **तपशिल** | | **२०२५-२६ चे सुधारीत** | | **२०२६-२७ चे मुळ** |
|---|---|---|---|---|
| सन २०२५-२६ चे सुधारित व सन २०२६-२७ चे मुळ अंदाजपत्रक **= एकूण जमा** | | २४१९६१.९५ | | ४५८५१७.९२ |
| सन २०२५-२६ चे सुधारित व सन २०२६-२७ चे मुळ अंदाजपत्रक **= एकूण खर्च** | | २४०१०१.८० | | ४५६६२३.८६ |
| **अखेरची शिल्लक** | | **१८६०.१५** | | **१८९४.०६** |

**मनोज दुबे:-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती:-**

ठराव सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**प्रकरण क्र. १५ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेचे सन २०२५-२६ चे सुधारित व सन २०२६-२७ चे मूळ अंदाजपत्रकास मंजुरी मिळणेबाबत. (अ (सर्वसाधारण) + क (पाणी पुरवठा))

**ठराव क्र. १२ :-**

मा. आयुक्त मिरा भाईंदर महानगरपालिका यांनी सादर केलेले सन २०२५-२६ चे सुधारित व सन २०२६-२७ मुळ अंदाजपत्रकामध्ये मा. आयुक्तांचे अंदाजामध्ये सुचविलेली उत्पन्नातील अपेक्षित वाढ/घट आणि सुधारित अदाजपत्रकातील वाढ/घट त्यानुसार विभागण्यात आलेला खर्च विचारात घेवून सन २०२६-२७ चे मुळ अंदाजपत्रक रक्कम रू. **१८९४.०६/-** लाख इतक्या रक्कमेच्या शिल्लकी अंदाजपत्रकास आजची सभा मंजूरी देत आहे अंतिम मान्यतेसाठी मा. महासभेपुढे अर्थसंकल्प सविनय सादर करीत आहोत.

**रु. लाखात**

| तपशिल | | २०२५-२६ चे सुधारीत | | २०२६-२७ चे मुळ |
|---|---|---|---|---|
| सन २०२५-२६ चे सुधारित व सन २०२६-२७ चे मुळ अंदाजपत्रक **= एकूण जमा** | | २४१९६१.९५ | | ४५८५१७.९२ |
| सन २०२५-२६ चे सुधारित व सन २०२६-२७ चे मुळ अंदाजपत्रक **= एकूण खर्च** | | २४०१०१.८० | | ४५६६२३.८६ |
| **अखेरची शिल्लक** | | **१८६०.१५** | | **१८९४.०६** |

सुचक :- श्री. संजय थेराडे अनुमोदन :- श्री. **मनोज दुबे**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**महापालिका सचिव:-**

प्रकरण क्र. १६, परिवहन सेवेचे सन २०२५-२६ चे सुधारित व सन २०२६-२७ चे मूळ अंदाजपत्रकास मंजुरी मिळणेबाबत. (ब - अंदाजपत्रक)

**संजय थेराडे:-**

मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन उपक्रम यांनी सादर केलेले सन २०२५-२६ चे सुधारित व सन २०२६-२७ च्या मुळ अंदाजपत्रकामध्ये अपेक्षित वाढ/घट आणि त्यानुसार विभागण्यात आलेला खर्च विचारात घेवून अंदाजपत्रकास आजची सभा मंजूरी देत आहे अंतिम मान्यतेसाठी मा. महासभेपुढे अर्थसंकल्प सविनय सादर करीत आहोत.

**रु. लाखात**

| तपशिल | | २०२५-२६ चे सुधारीत | | २०२६-२७ चे मुळ |
|---|---|---|---|---|
| **परिवहन जमा (हस्तांतरणा सहित)** | | **९४०४.९८** | | **१३२७२.९८** |
| **परिवहन खर्च** | | **८२६५.२०** | | **१३०४७.२०** |
| **अखेरची शिल्लक** | | **११३९.७८** | | **२२५.७८** |

**वंदना भावसार:-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती:-**

ठराव सर्वानुमते मंजूर.

**प्रकरण क्र. १६ :-**

परिवहन सेवेचे सन २०२५-२६ चे सुधारित व सन २०२६-२७ चे मूळ अंदाजपत्रकास मंजुरी मिळणेबाबत. (ब - अंदाजपत्रक)

**ठराव क्र. १३ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन उपक्रम यांनी सादर केलेले सन २०२५-२६ चे सुधारित व सन २०२६-२७ च्या मुळ अंदाजपत्रकामध्ये अपेक्षित वाढ/घट आणि त्यानुसार विभागण्यात आलेला खर्च विचारात घेवून अंदाजपत्रकास आजची सभा मंजूरी देत आहे अंतिम मान्यतेसाठी मा. महासभेपुढे अर्थसंकल्प सविनय सादर करीत आहोत.

**रु. लाखात**

| तपशिल | | २०२५-२६ चे सुधारीत | | २०२६-२७ चे मुळ |
|---|---|---|---|---|
| परिवहन जमा (हस्तांतरणा सहित) | | ९४०४.९८ | | १३२७२.९८ |
| परिवहन खर्च | | ८२६५.२० | | १३०४७.२० |
| **अखेरची शिल्लक** | | **११३९.७८** | | **२२५.७८** |

**सुचक :- श्री. संजय थेराडे** **अनुमोदन :- श्रीम. वंदना भावसार**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**मा. सभापती :-**

सर्व सदस्यांचे आभार आजची सभा खेळीमेळीच्या वातावरणार पार पडली.

**सभा संपल्याची वेळ :- दु. १२.०५ वा.**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**(दिनेश कैलास कानगुडे)**
**महापालिका सचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**